पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३२**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. ५/११/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १५१०**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१०/२०१८ ते दि.२३/१०/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/३८८० दि. ३०/१०/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १५११**

मा.अविनाश बागवे व मा.विशाल धनवडे यांचे दि. २६/१०/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात '' स्मार्ट सिटी '' PSCDCL योजना व पुणे पिंपरी चिंचवड संयुक्तिक PMPML या स्थापित कंपनीकडुन सार्वजनिक वाहतुक व्यवस्था उपक्रम राबवतात. या दोन्ही संस्था पुणे मनपा हद्दीत कार्यरत असून मनपा मालकीच्या जागा, इमारती, जाहिराती हक्क व प्रकल्पहिस्सा शासकिय अनुदान अशा अनेक बाबींवर मनपावर मोठया प्रमाणावर अवलंबून असतात. या संस्थांच्या बहुतांशी प्रकल्पात मनपा चा संयुक्त आर्थिक सहभाग असतो. मात्र या दोन्ही कंपन्या पुणे मनपास प्रशासकिय कामकाजात सहभागी करून घेण्याचे टाळत असतात. स्मार्ट सिटी PSCDCL व PMPML या दोन्ही कंपन्यांच्या संचालक मंडळ सभेतील निर्णय, कार्यवृत्तांत, टेंडर मान्यता हे पुणे मनपा शहर सुधारणा, स्थायी व मुख्य सभेच्या निदर्शनास आणणे अत्यंत गरजेचे आहे. पुणेकरांना अंधारात ठेऊन एकाधिकारशाहीने पुणेकरांचे कोटयावधी रूपयांचे आर्थिक निधी पुर्णतः फसलेल्या प्रकल्पातुन वाया जात असल्याचे दुर्दैवी हे चित्र निदर्शनास येत आहे. उदा. व्हर्च्युअल मेसेजिंग डिसप्ले (VMD) 24X7 पाणी योजना, बायसिकल शेअर योजना, एल.इ.डी. दिवे (SMART LIGHTING) स्मार्ट फुटपाथ..

PMPML कंपनीस पुणे मनपा शब्दशः जगवत असुनही PMPML प्रशासन पुणे मनपा मुख्य सभा, नगरसेवक यांच्या सुचनांचे अनादर करत पुर्णपणे दुर्लक्ष करते. PSCDCL व PMPML या दोन्ही कंपन्यांचा कारभार बघणाऱ्या मूठभर अधिकाऱ्यांच्या मनमानी, अपारदर्शक कारभारामुळे या दोन्ही संस्था व पुणे मनपा यांच्या संबंधात वितुष्ट येत आहे. किंबहुना जाणीवपुर्वक या दोन्ही कंपन्या धोरणात्मक निर्णय, प्रदिर्घ काळ चालणाऱ्या योजना बाबत मनपाशी समन्वय साधत नाही. पारदर्शक भ्रष्टाचार मुक्त कारभारासाठी स्मार्ट सिटी PSCDCL व PMPML या दोन्ही कंपन्यांच्या संचालक मंडळातील सर्व धोरणात्मक, आर्थिक निर्णय कार्यवृत्तांत पुणे मनपा मुख्य सभा यांस सादर करण्यात यावे.

**विषय क्र. १५१२**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांचे दि. ३०/१०/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून पुणे शहरामध्ये विविध प्रकारची विकासकामे केली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते, विदयुत, ड्रेनेज, पाणी इ. कामांचा समावेश असतो. प्रस्तुतची कामे ही दरवर्षी केली जातात. ही कामे खाजगी ठेकेदारांमार्फत करून त्यांना कामाचा मोबदला दिला जातो. वास्तविक पाहता एखादया कामाचे पूर्वगणनपत्रकापेक्षा काम मिळविण्याच्या स्पर्धेतून खाजगी ठेकेदार ही कामे ३० ते ३५ टक्के बिलो रकमेने करण्यास तयार असतात. त्यामुळे कामाचा दर्जा हा निकृष्ट होण्याची संभवना असते. भविष्यात कामा संबंधित त्रुटी, दुरूस्ती करावयाची झाल्यास संबंधित ठेकेदाराकडून ती केली जात नाही व यामुळे भविष्यात होणा-या दुर्घटनांना महानगरपालिकेस जबाबदार ठरविले जाते. सबब ठेकेदार जेवढी रक्कम बिलो जाईल त्या रकमेचा डीडी हा पुणे महानगरपालिकेकडे जमा करून घेण्यात यावा व डिफेक्ट लायबिलिटी पिरियड पर्यंत त्या कामामध्ये सभासदाने अथवा कोणत्याही नागरिकांनी तक्रार केल्यास जमा असलेल्या डीडीच्या रकमेतून दुरूस्तीचे काम तातडीने करण्यात यावे. त्यामुळे ठेकेदाराकडे पाठपुरावा न करता दुरूस्तीचे काम ताबडतोब करणेस मदत होईल. काम करून उर्वरित रक्कम संबंधित ठेकेदारास डिफेक्ट लायबिलिटी पिरियड संपल्यानंतर देण्यात यावी. यामुळे पुणे महानगरपालिकेची विकासकामे करतानाच ठेकेदारांकडून चांगल्या दर्जाची केली जातील व नागरिकांच्या कररूपी निधीचा अपव्यय टाळला जाईल.

**विषय क्र. १५१३**
मा.सिध्दार्थ शिरोळे यांचे दि. ३०/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१४ ड मधील उद्यानामध्ये विविध कामे करणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२६अे३३६/एसयु१-६७८, प्रभाग क्र.१४ ड मध्ये विविध गार्डनमध्ये रिव्हर्स ओसमिसिस वॉटर कामे करणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम प्रभाग क्र.१४ ड मधील उद्यानामध्ये विविध कामे करणे | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १५१४**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ वडगांवशेरी विभागाकडील अे फॉर्म क्र. १००/०८-०९, अे फॉर्म क्र. ३८/०६-०७, अे फॉर्म क्र. १०१/०८-०९, अे फॉर्म क्र. ४१ सन १०-११, अे फॉर्म क्र. ३/१०-११ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१८३८ दि.२४/१०/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १४ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. १५१५**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ कोंढवा बुद्रुक सन २०१०-११ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१८४० दि. २५/१०/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १२ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. १५१६**

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील वार्षिक विवरणपत्र व तद्नुषंगिक उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१८६९ दि. २९/१०/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १५ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १५१७**

समाविष्ट २३ गावांमधील प्रमुख रस्त्यांची रुंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१०(१)(ब) अन्वये वाढविणेबाबत मा.आबा बागुल यांचे दि. २१/८/२०१८ चे फेरविचाराच्या पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९७८ दि.२८/८/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शहर अभि./६३४ दि.२६/१०/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १५१८**

पुणे मनपाच्या हडपसर येथे नव्याने विकसित होत असलेल्या राजश्री शाहु स्मारक इमारतीसाठी ६३० के.व्ही.ए. क्षमतेचे कॉम्पेक्ट सबस्टेशन उभारणे व तद्नुषंगिक विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९२,४१,५४७=८४ पेक्षा ८.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४,७१,७२६=९० उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करण्यास आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६४३ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५१९**

पुणे मनपाकडील मलनि:सारण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध मैलापाणी शुध्दीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केलेल्या पाण्यावर निर्जंतुकीकरण (जंतूविरहीत) करण्यासाठी क्लोरिनडायऑक्साईड पावडरचा पुरवठा करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.व्ही.केमिकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३९०/– प्रति कि.ग्रॅ. या दराने र.रु.६१,००० कि.ग्रॅ. क्लोरिनडायऑक्साईड पावडर एकुण र.रुपये २,३७,९०,०००/– पर्यंत खरेदी करणेस व त्यासाठी त्यांचेशी करारनामा करण्यास तसेच त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांना बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत–मलनि/६४४ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १५२०**

निविदा क्र.४६/१६ एल.ई.डी.प्रकल्पातील मे.टाटा प्रोजेक्ट लि. यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे नावे केलेल्या करारनाम्यास व त्यापोटी त्यांना अदा केलेल्या बिलाबाबत, बिल अदा करण्यासाठी पेमेंट रिझर्व A/C ( Payment reserve account) मे.कोटक महिंद्रा बँकेमध्ये उघडण्यात आले असुन व त्या A/C मध्ये अगाऊ बिलापोटीचे जमा करण्यात आलेल्या र.रू. २४,२९,८६,७१५/– च्या प्रक्रियेस व या पुढील कालावधीत पुणे मनपा हद्दीमध्ये करावयाच्या प्रकाश व्यवस्थेच्या कामी निविदा अटी व शर्तीनुसार या निवेदनातील खालील अ.क्र १ते ४ नुसार कार्यवाही करणेची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/५३१ दि.२५/९/२०१८ चे पत्र.

१) प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी मा.स्थायी समिती यांची ठराव क्र १२०४ दि.०६/०९/२०१६अन्वये मे.टाटा प्रोजेक्ट लि. यांचे निविदेस व सदर निविदेमधील अटी शर्तीनुसार १२ वर्षे देखभाल व दुरूस्तीची कामे करून घेण्यास मान्यता मिळाल्यानंतर विद्युत विभागाने निविदा अटी व शर्ती सेक्शन २ मधील क्लॉज २.५ नुसार मे.टाटा प्रोजेक्ट लि.यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे नावे केलेल्या करारनामा केला असून त्यापोटी त्यांना बिल अदा करण्यात येत आहे.

२) या कामामध्ये ठेकेदार मे.टाटा प्रोजेक्ट लि.यांचा ९९.९% शेअर असलेले एस.पी.व्ही. कं. मे. उज्ज्वल पुणे लि. यांचे बिल अदा करण्यासाठी निविदा अटी व शर्ती सेक्शन ३ मधील क्लॉज ५ नुसार पेमेंट रिझर्व A/C ( Payment reserve account) मे.कोटक महिंद्रा बँकेमध्ये उघडण्यात आले असुन त्या A/C मध्ये अगाऊ बिलापोटीचे र.रू. २४,२९,८६,७१५/– जमा करण्यात आले आहे व सदर जमा रक्कम मेंटेन करुन IMP&VP च्या प्रोटोकॉलमध्ये देण्यात आलेल्या एनर्जी सेव्हिंगच्या सुत्रानुसार दरमहा एनर्जी सेव्हिंगची बिले याच खात्यातून देण्यात येत आहे.

३) मा.प्रधान महालेखाकार(लेखा परीक्षा)–१ महाराष्ट्र यांचे कार्यालयामार्फत निविदा क्र–४६/२०१६ एल.ई.डी. प्रकरणाचे लेखा परीक्षण करण्यात आले असून सदर लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेला असून सदरचा अहवाल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेले आहे.

४) मा.मुख्य लेखा परीक्षक, पुणे मनपा यांनी सुध्दा एल.ई.डी. प्रकल्पाचे लेखा परीक्षण मा.मुख्य सभेच्या आदेशानुसार केलेले असून सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला असून सदरचा अहवाल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेले आहे.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२१**

Implementation of Grid Connected Rooftop Solar PV System on the Roofs of PMC Building with 5 years Comprehensive Operation and Maintenance (बी–२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.ॲण्ड एन.इंजिनिअरिंग ॲण्ड मार्केटिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून निविदा अटी व शर्तीनुसार तडजोडीचे दरानुसार प्रोजेक्ट कॉस्ट (५ वर्षासाठी नि:शुल्क क्रॉम्प्रिएन्सिव ऑपरेशन व मेंटेनन्ससहित) र.रुपये ४,९५,००,०००/– पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६०८ दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२२**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२७**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५२८**

श्री.मुलाणी इसाक बाबुलाल, लघुलेखक, प्राथमिक शिक्षण विभाग यांचे वेतनश्रेणीबाबत मा.योगेश समेळ व मा.अविनाश बागवे यांचे दि. २/५/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२ दि. २/५/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/७५१ दि.५/१/२०१८ ने पाठविलेल्या अभिप्रायावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२४ दि. १६/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/४६२ दि.१०/९/२०१८ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३०/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १५२९**

पुणे महानगरपालिका हद्दीत क्रीडा क्षेत्रास अधिक गतीने चालना मिळणेकरीता व पुणे शहराचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक होण्याच्या दृष्टीने मा.अति.महा.आयुक्त(वि) यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या पुणे महानगरपालिका सुधारित क्रीडा धोरण २०१८ (मसुदा) यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) जा.क्र. मआ/क्रीडा/३८१, दि. ०९/०८/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. २३ दि.१६/१०/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. १५३०**

पुणे पेठ बिबवेवाडी प्रभाग क्र.७० ब, स.नं.६८०/६८१ (पार्ट) येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक शाळेमधील कै. शकुंतला किसनराव शिंदे क्रीडा संकुलाचा बॅडमिंटन हॉल लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ७ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक शिवराज शिक्षण संस्था, कृष्णाई प्लॉट नं ३२, लेक व्युव्ह कॉ.ऑप. सोसायटी सुखसागरनगर,पुणे-४६ यांनी देऊ केलेले वार्षिक भाडे र.रू. ४,३०,०००/-( र.रू. चार लाख तीस हजार फक्त) मनपाने निश्चित केलेल्या वार्षिक भाडे रक्कमेपेक्षा ८१.२४% ने अधिक रकमेची असल्याने त्यांची निविदा स्विकृत करणेस व निविदा अटी व शर्ती नुसार त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत .मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्री.वि./५९५,दि.१५/१०/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६९ दि.२६/१०/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. १५३१**

१)प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या मालकीच्या इ.डब्लू.एस (EWS) व एच.डी.एच (HDH) या आरक्षणातील जमिनीवर बांधण्यात येणा-या सदनिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ क व ड नुसार व महापालिका जागा वाटप नियमावली महाराष्ट्र शासन दि.६ मार्च २००८ नुसार भाडेपटटा स्वीकारून कराराने पात्र लाभार्थ्यास सदनिका हस्तांतरीत करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

२)प्रधानमंत्री आवास सर्वांसाठी घरे-२०२२ या मे.केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजना राबविणेचे अनुषंगाने

i) प्रकल्प राबविण्यासाठी मे.शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार योग्य पर्याय/प्रतिकृतीची निवड करणे

ii) प्रकल्प राबवितांना कायदेशीर तांत्रिक बाबीची पुर्तता अंमलबजावणी करणे

iii) पात्र लाभार्थ्यांना सदनिकेचे वाटप,एकदा वाटप केलेली सदनिका काही कारणाने फेरवाटप करणे

व इतर तदनुषंगिक बार्बीची पुर्तता आदी बाबींची पुर्तता करण्याचे सर्वाधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

३)प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर प्रकल्प अहवालाच्या जागांवर योजना राबविण्यासाठी महारेरा (Maharashtra Real Estate Regulatory Authority) कायदयांतर्गत महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका या नावाने प्रमोटर्स व बिल्डर्स म्हणून नोंदणी करण्यास वरील ३ बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.आ/PMay/ ६२६, दि.२२/१०/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७० दि.२९/१०/२०१८ विचारासाठी.

**विषय क्र. १५३२**

पुणे शहरातील मृत जनावरांची विल्हेवाट लावणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६४६ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

१) मे.दिल्लीवाला ॲन्ड सन्स यांना मा.स्थायी समिती ठ.क्र.१७७, दि.१३/५/२००८ व मा.मुख्य सभा ठ.क्र २६०, दि.२०/१०/२००८ या ठरावास अनुसरुन नायडू पॉड लगतचा इंसिनेरेटर कार्यान्वित होई पर्यत पुणे शहरातील मोठे मृत प्राणी उचलणे व त्यांची विल्हेवाट लावणे या कामासाठी मुदतवाढ देणेबाबत पश्चात मान्यता मिळणेस व त्याप्रमाणे पुरवणी करारनामा करणेस.

२) मे.दिल्लीवाला ॲन्ड सन्स यांना प्रतिमहा रक्कम रुपये ३,९३,८२८/- प्रमाणे त्यांना इंसिनेरेटर कार्यान्वित होईपर्यत मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे बिले आदा करणेस (मार्च २०१९ अखेर र.रु.४७,२५,९३६/- अधिकतम)

**विषय क्र. १५३३**

पुणे पेठ कोथरुड स.नं. १४७, हि.नं.२+१अ व २/ब+३+४+५/अ येथील PMPML & ST साठी आरक्षित असलेली ९ आर व १८ आर क्षेत्र जमीन संपादन करणेची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/६४८ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५३४**

मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणेकरीता खालीलप्रमाणे वर्गीकरणाने तरतूद र.रू. १२.५० कोटी उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६४९ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक,<br>**समाज विकास विभाग,**<br>१) पुणे शहरात लाईट हाऊस प्रकल्प सुरू करणे, (FE14D136), पान क्र.१४२.<br>२) पुणे शहरातील रस्त्यावरील मुलांकरीता विविध उपक्रम राबविणे, (FE14C208) पान क्र. १४०.<br>३) आरोग्य विभाग, कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडिकल वेस्ट प्लँट समोरील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे व इतर सुधारणा कामे करणे व विद्युत दाहिनी बसविणे (RE17F236), पान क्र. ६०. | ३०० लाख<br>७५० लाख<br>२०० लाख | ----<br>----<br>---- |
| नविन सुचविलेले काम<br>मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे | ---- | १२५० लाख |

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**